अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे

# अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग ॲन्ड रिसर्च

पर्वती, पुणे. ४११००९

---

## महाविद्यालय विकास समिती

सभा दिनांक :— ०१/०४/२०१८

## कार्यवृत्त

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग ॲन्ड रिसर्च महाविद्यालय विकास समितीची सभा रविवार दि. ०१/०४/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे प्रशासकीय भवन, पर्वती, पुणे.४११००९ येथे आयोजित केली होती.

सदर सभेस खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री. अजितदादा अनंतराव पवार | सभेचे अध्यक्ष, महाविद्यालयीन विकास समिती |
| २ | मा.सौ.प्रमिला भागवतराव गायकवाड | सरचिटणीस, अ.भा.म.शि.परिषद,पर्वती,पुणे |
| ३ | मा.श्री.संदीप सुदामराव कदम | संयुक्त चिटणीस, अ.भा.म.शि.परिषद,पर्वती,पुणे |
| ४ | मा.श्री.भगवानराव बाबुराव साळुंखे | संयुक्त चिटणीस, अ.भा.म.शि.परिषद,पर्वती,पुणे |
| ५ | मा.श्री.विजयसिंह यशवंतराव जेधे | खजिनदार, अ.भा.म.शि.परिषद,पर्वती,पुणे |
| ६ | मा.श्री.धैर्यशील वसंतराव वंडेकर | सदस्य,महाविद्यालय विकास समिती |
| ७ | मा.श्री.नवनाथ पासलकर | सदस्य,महाविद्यालय विकास समिती |
| ८ | डॉ.सुनिल भिमराव ठाकरे | सचिव/प्राचार्य |
| ९ | प्रा.गणेश एकनाथ कोंढाळकर | शिक्षक प्रतिनिधी |
| १० | प्रा. दत्तात्रय पांडुरंग कांबळे | शिक्षक प्रतिनिधी |
| ११ | प्रा.मनोज आनंदराव मुळीक | शिक्षक प्रतिनिधी |
| १२ | प्रा.शैलेश शिवाजी हजारे | शिक्षक प्रतिनिधी |
| १३ | प्रा.स्नेहल मोहन वीर | शिक्षक प्रतिनिधी |

सदर समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.शशिकांत शंकरराव सुतार यांनी उपस्थित राहू शकणार नसल्याचे कळविले. सभेने मा.श्री. शशिकांत सुतार यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून रजा मंजूर केली.

दिवंगत नेते व संस्थेचे सभासद मा.पतंगरावजी कदम यांस श्रध्दांजलीचा ठराव मा.श्री.भगवानराव साळुंखे यांनी मांडला व त्यानुसार सर्वांनी उभे राहून श्रध्दांजली वाहिली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालील मान्यवरांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला.

१. खा. सुप्रियाताई सुळे :– उत्कृष्ठ संसदपटू पुरस्कार मिळाल्याबद्दल
२. मा. सुनेत्राताई पवार :– सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर निवड झाल्याबद्दल
३. मा. संदिप कदम :– सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर निवड झाल्याबद्दल
४. प्रा. सुनिल ठाकरे :– सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बोर्ड ऑफ स्टडीज सिव्हिल इंजिनीअरिंग मध्ये निवड झाल्याबद्दल

वरील सर्व मान्यवरांचे अभिनंदन करण्यात आले.

सभेची वेळ व गणसंख्या पुर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष मा. अजितदादा पवार यांनी उपस्थित सदस्याचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**विषय क्र. १** : मागील दि. १०/१०/२०१७ च्या सभेचे कार्यवृत्त मंजूर करणे.

**ठराव** : मागील दि. १०/१०/२०१७ च्या सभेचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**विषय क्र. २** : मागील दि. १०/१०/२०१७ च्या सभेतील ठरावाच्या कार्यवाहीची माहिती घेणे.

**ठराव** : मागील दि. १०/१०/२०१७ च्या सभेतील ठरावाच्या कार्यवाहीची माहिती सभेने माहिती घेतली.

**विषय क्र. ३** : शैक्षणिक वर्ष २०१८–१९ करिता फी नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयास मंजुर केलेल्या फी बाबत माहिती घेणे.

**ठराव** : शैक्षणिक वर्ष २०१८–१९ करिता फी नियामक प्राधिकरण, मुंबई

यांनी महाविद्यालयाची फी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांकरिता खालील प्रमाणे मंजुर केलेली आहे.

| अभ्यासक्रम | शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ | शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ |
|---|---|---|
| पदवी | ५२,०००/— | ५९,०००/— |
| पदव्युत्तर पदवी | ६७,०००/— | ६९,०००/— |

वरीलप्रमाणे सभेने शैक्षणिक वर्ष २०१८—१९ करिता फी नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी मंजूर केलेल्या फी बाबत माहिती घेतली.

**विषय क्र. ४** : शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या राजीनाम्यास मंजुरी देणे.

**ठराव** : अभियांत्रिकी महाविद्यालयातील खालील नमुद शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी राजीनामे दिलेले आहे.

| अ. क्र. | नाव | पद | विभाग | राजीनामा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा. रश्मी वडे | सहाय्यक प्राध्यापक | सिव्हिल इंजिनीअरिंग | ०९/१०/२०१७ |
| २ | प्रा. अशोक एम. अडमूठे | सहाय्यक प्राध्यापक | सिव्हिल इंजिनीअरिंग | ०२/१२/२०१७ |
| ३ | प्रा. राहूल शर्मा | सहाय्यक प्राध्यापक | प्रथम वर्ष | २१/१२/२०१७ |
| ४ | प्रा. प्रियंका गायकवाड | सहाय्यक प्राध्यापक | इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी | ०१/०१/२०१८ |
| ५ | श्री. सागर वाळूंज | कार्यालय अधिक्षक | कार्यालय | ०६/११/२०१७ |
| ६ | श्री. तेजस सोनवणे | प्रयोगशाळा सहाय्यक | ई अॅण्ड टी. सी | ०६/०१/२०१८ |
| ७ | श्री.राहूल क्षिरसागर | प्रयोगशाळा सहाय्यक | सिव्हिल इंजिनीअरिंग | १०/०७/२०१७ |
| ८ | श्री. सचिन पवार | शिपाई | कार्यालय | १३/०२/२०१८ |
| ९ | प्रा. पंकज पाटील | प्राध्यापक | प्रथम वर्ष | ३१/०३/२०१८ |

सभेने वरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या राजीनाम्याची माहिती घेतली व सर्वानुमते मंजुरी दिली.

**विषय क्र. ५** : अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट विभागाच्या कामाचा आढावा घेणे.

**ठराव** : अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट विभागाच्या कामाचा आढावा खालीलप्रमाणे आहे :—

१. शैक्षणिक वर्ष २०१७—१८ करिता विविध कंपनींमध्ये निवड झालेले विद्यार्थी संख्या :—

| अ. क्र. | विभाग | कंपनीचे नाव | निवड झालेले एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | आय.टी इंजिनीअरिंग | झेन्सार, पुणे | ०१ |
| २ | ई अॅन्ड टी सी इंजिनीअरिंग | टी सी एस, पुणे | ०१ |
| ३ | कॉम्प्युटर/आय.टी इंजिनीअरिंग | टी सी एस, पुणे | ०८ |
| ४ | कॉम्प्युटर/आय.टी इंजिनीअरिंग | क्युस्पायडर, पुणे | ०४ |
| ५ | आय.टी इंजिनीअरिंग | इन्फोसिस, पुणे | ०१ |
| ६ | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | टाटा स्ट्राईव्ह, पुणे | २० |
| ७ | ई अॅन्ड टी सी इंजिनीअरिंग | व्हिक्ट्रॉनिक्स कंट्रोल, पुणे | ०२ |

२. सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अॅन्ड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यामानाने रोजगार मेळावा दि. २४/०२/२०१८ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला. सदर मेळाव्यात २४ कंपन्या व विविध अभियांत्रिकी महाविद्यालयामधून ६०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

३. अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अॅन्ड रिसर्च महाविद्यालय व कॅड सेंटर, पुणे यांचे मार्फत मेकॅनिकल इंजिनीअरिंग, सिव्हिल इंजिनीअरिंग व इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळावा दि. २४/०३/२०१८ रोजी आयोजित करण्यात आला. सदर मेळाव्यास ७० कंपन्या व विविध अभियांत्रिकी महाविद्यालयामधून २४८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

४. सभेने ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट विभागाच्या कामाचा आढावा घेत असताना सभेच्या असे निदर्शनास आले की आपल्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी इंग्रजी भाषेवरील कमी प्रभुत्वामुळे चांगल्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळविण्यामध्ये मागे पडत आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाढविण्यासाठी विषेश प्रशिक्षण देण्याऱ्या व्यक्ती / संस्थांची मदत घेण्याचे ठरले व येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष ते चतुर्थ वर्षापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत बोलणे व विचार मांडणे याकरिता प्रशिक्षण देण्याबाबत सुचित करण्यात आले.

**विषय क्र. ६** : अभियांत्रिकी महाविद्यालयातील ॲडजन्ट फॅकल्टीच्या नेमणुकीस मान्यता देण्याबाबत.

**ठराव** : १. महाविद्यालयातील ॲडजन्ट फॅकल्टीच्या नेमणुकीची सभेने माहिती घेतली.

| अ.क्र. | नाव | विभाग | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतन प्रति माह |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा. सुहास देशपांडे | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | एम. टेक (आय. आय.टी– मुंबई) | ३६ वर्ष | रु. २५,०००/– |
| २ | डॉ. दशरथ पायगुडे | सिव्हिल इंजिनीअरिंग | पी. एच. डी. | शैक्षणिक – ३८ वर्ष | रु. १२,०००/– |
| ३ | डॉ. पदमाकर केळकर | ई ॲन्ड टीसी इंजिनीअरिंग | पी. एच. डी. | शैक्षणिक – ०१ वर्ष<br>औद्योगिक – ४३ वर्ष | रु. २०,०००/– |
| ४ | डॉ. प्रदिप अवसारे | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | पी. एच. डी. (डिझाईन इंजि.) | शैक्षणिक – ३० वर्ष<br>औद्योगिक – ०७ वर्ष<br>प्राचार्य पदाचा अनुभव, Mech BOS Chairman | रु. २५,०००/– |

वरील नेमणुकांस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

२. महाविद्यालयात सुरु इनोव्हेशन क्लब बाबत तसेच नेमलेल्या Professor Emeritus / मार्गदर्शकांची माहिती घेण्यात आली.

| अ. क्र. | नाव | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतन प्रति माह |
|---|---|---|---|---|
| | | **Professor Emeritus** | | |
| १ | इंजि. अशोक सराफ (संस्थापक सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे) | एम.टेक (आय.आय.टी– मुंबई) | ३० वर्ष | रु. २०,०००/– |
| २ | इंजि. अतूल मराठे | बी.टेक (आय.आय.टी– मुंबई) | ३० वर्ष | रु. २०,०००/– |
| ३ | इंजि. सुदर्शन नातू | एम.टेक (आय.आय.टी– मुंबई) | २० वर्ष | रु. २०,०००/– |
| ४ | इंजि. महेश वैद्य | एम.टेक (आय.आय.टी– मुंबई) | ३२ वर्ष | रु. २०,०००/– |
| | | **मार्गदर्शक** | | |
| ५ | डॉ. एस.एस. मंथा (माजी अध्यक्ष, AICTE, New Delhi) | पी. एच. डी. – मेकॅनिकल इंजि. | २५ वर्ष | तसिका तत्वावर मानधन व प्रवास खर्च |
| ६ | प्रा. अशोक रानडे, यॉर्क विद्यापीठ, टोरांटो, कॅनडा | बी. टेक (एरॉनॉटीकल इंजि), MBA | ३० वर्ष | तसिका तत्वावर मानधन व प्रवास खर्च |

वरील प्रमाणे इनोव्हेशन क्लब सुरु करण्यास व Professor. Emeritus / मार्गदर्शकांच्या नेमणुकांस सभेने सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र. ७ : अभियांत्रिकी महाविद्यालयाने विविध औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील संस्थांसोबत केलेल्या करारासंदर्भात माहिती घेण्याबाबत.

ठराव : अभियांत्रिकी महाविद्यालयाने विविध औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील संस्थांसोबत केलेल्या करारांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग स्तरावरील करार | कंपनी /संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | सिव्हिल इंजिनीअरिंग | अशोका कंस्ट्रक्शन, पुणे |
| २ | सिव्हिल इंजिनीअरिंग | महान इंस्टिटयुट ऑफ लिडरशिप ॲन्ड एक्सलन्स, पुणे |
| ३ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | सिड इंफोटेक लिमिटेड, पुणे |
| ४ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग / इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | पालो अल्टो नेटवर्क, पुणे |
| ५ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग / इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | डेल ई एम सी ॲकडमीक मेंबरशिप, पुणे |
| ६ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग / इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | ॲमेझॉन ए डब्ल्यु एस वन ईअर मेंबरशिप, पुणे |
| ७ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग / इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | ओरॅकल ॲकडमी मेंबरशिप, पुणे |
| ८ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग / इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | झेन्सार टेक्नॉलॉजी लिमिटेड, पुणे |
| ९ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग / इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | ऑप्युलेन्ट इंफोटेक, पुणे |
| १० | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | मायक्रो एंबिडेड टेक्नॉलॉजी, पुणे |
| ११ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | गोपाळ हायस्कूल आणि राम शर्मा ज्युनिअर कॉलेज, पुणे |
| १२ | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | पंडीत ॲटोमोटीव्ह, पुणे |
| १३ | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | इंजिन इन्साईट रिसर्च एजन्सी प्रा.लि., पुणे |
| १४ | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | जी.टी.टी. , पुणे |
| १५ | ई ॲन्ड टीसी | डिंग टॉक, पुणे |

| | | |
|---|---|---|
| १६ | महाविद्यालय स्तरावरील करार | कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे. |
| | | फायर अॅन्ड सेक्युरिटी असोशिएशन ऑफ इंडिया, दिल्ली |
| | | ग्लोबल टॅलेंट ट्रक प्रा. लि., पुणे |
| | | कांगो एज्युकेशनल सर्व्हिस, मुंबई यांचे मार्फत गेट परीक्षेसाठी मार्गदर्शन वर्ग व सराव परीक्षा केंद्र, मुंबई |

वरील शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील संस्थासोबत करण्यात आलेल्या करारास मंजूरी दिली.

**विषय क्र. ८** : अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र व फाळणी नकाशा पुणे महानगरपालिकेकडून मिळविण्याबाबत.

**ठराव** : अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र व फाळणी नकाशा पुणे महानगरपालिकेकडून मिळण्याबाबत सभेने माहिती घेतली. संस्थेचे लेखापाल पेशवे, पुणे यांनी सदर बाबतीत महानगरपालिकेशी केलेल्या पत्रव्यवहार इत्यादीची माहिती घेतली. सभेचे अध्यक्ष मा. अजितदादा पवार यांनी महानगरपालिका आयुक्तांशी दुरध्वनीव्दारे संवाद साधून सदर बाबतीत संस्थेला सहकार्य करण्याविषयी चर्चा केली.

**विषय क्र. ९** : अभियांत्रिकी महाविद्यालयात फेब्रुवारी २०१८ पर्यंत झालेल्या खरेदीस मंजूरी देण्याबाबत.

**ठराव** : अभियांत्रिकी महाविद्यालयात आय आय टी, मुंबई यांचे रिमोट सेंटर सुरु करण्यासाठी खालीलप्रमाणे आवश्यक वस्तुंची खरेदी करण्यात आली.

| अ.क्र. | उपकरणे | नग | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | यामाहा एम जी एक्स यु मिक्सर | १ | २८,५००/- |
| २ | यामाहा वाल माऊंट स्पिकर | २ | ४६,०२०/- |
| ३ | यामाहा पॉवर एम्प्लीफायर पी एक्स ८ | १ | ४९,४५०/- |
| ४ | एस व्ही एक्स १४/सी व्ही एल पोडीयम माईक | १ | १९,५००/- |
| ५ | एस व्ही एक्स २४/सी व्ही एल पोडीयम माईक | १ | २०,९००/- |
| ६ | केबल | ५० मिटर | ५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | इनपुट आऊटपुट केबल | ....... | ५,०००/– |
| ८ | सोनी पी जे ४१० एच डी आर कॅमेरा | १ | ३८,०००/– |
| ९ | व्हिडिओ कार्ड | १ | २४,७८०/– |
| | एकूण | | २,३७,१५०/– |

आय.आय.टी. मुंबई यांचे रिमोट सेंटर आपल्या अभियांत्रिकी महाविद्यालयास मिळालेले असून त्यासाठी झालेला एकूण खर्च रु. २,३७,१५०/– इतके सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मधील संक्षिप्त जमा खर्चाबाबत माहिती देण्यात आली.

| जमा रक्कमेचा तपशील | रक्कम रु. लाखामध्ये | खर्चाचा तपशील | रक्कम रु. लाखामध्ये |
|---|---|---|---|
| टयुशन फी | ३५३.७४ | वेतन<br>१. शिक्षक कर्मचारी (जाने. २०१८ पर्यंतचे)<br>२. शिक्षकेत्तर कर्मचारी (फेब्रु. २०१८ पर्यंतचे)<br>३. सेक्युरिटी गार्ड | <br>३३०.१५<br>३६.४६<br>३.१२ |
| ठेव | १०.२६ | क्लिनिंग,रिपेअरिंग अॅन्ड मेन्टेनन्स | १३.७५ |
| इतर जमा | १२.८२ | बुक्स अॅन्ड इक्युपमेंट<br>बुक्स<br>इक्युपमेंट | <br>४.५७<br>१७.१४ |
| शिष्यवृत्ती | ८३.०५ | इतर खर्च | ४०.५९ |
| टयुशन फी येणे बाकी | २०.९४ | देय वेतन<br>शिक्षक कर्मचारी (फेब्रु. व मार्च २०१८ चे वेतन)<br>शिक्षकेत्तर कर्मचारी (मार्च २०१८ चे वेतन) | <br>६९.२४<br>३.०७ |
| मार्च २०१८ अखेरीस येणारी तुट | ३७.३० | | |
| एकूण | ५१८.१२ | | ५१८.१२ |

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ वर्षामधील संक्षिप्त जमा खर्चाची सभेने सर्वानुमते मान्यता दिली व विद्यार्थ्यांकडे प्रलंबित फी तातडीने जमा करण्याबाबत सुचित करण्यात आले.

विषय क्र. १० : अभियांत्रिकी महाविद्यालयाने ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांसकडे शैक्षणिक वर्ष २०१८– १९ करिता सादर केलेल्या नुतनीकरण प्रस्तावाची माहिती सभेने घेतली.

ठराव : अभियांत्रिकी महाविद्यालयाने ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांसकडे शैक्षणिक वर्ष २०१८– १९ करिता सादर केलेल्या नुतनीकरण प्रस्तावाची माहिती सभेने घेतली. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८– १९ अभियांत्रिकी महाविद्यालयात खालील Bachlor of Vocational Courses सूरु करण्यासंदर्भात मान्यता देण्यात आली.

१. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट २. रेफ्रीजेरेशन अॅन्ड एअरकन्डिशनिंग

३. इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग अॅन्ड सर्व्हिसेस

४. अॅटोमोबाईल सर्व्हिसिंग

विषय क्र. ११ : ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांच्या नविन नियमानुसार महाविद्यालयात ४८ एम.बी.पी.एस क्षमतेची इंटरनेट लाईन घेण्याबाबत.

ठराव : अभियांत्रिकी महाविद्यालयात ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांच्या नविन नियमानुसार ४८ एम.बी.पी.एस इंटरनेट लाईन घेण्याबाबत सभेत चर्चा झाली. सदर बाबतीत महाविद्यालयीन स्तरावर बोलविलेल्या ५ पुरवठादारांच्या दरपत्रकामधून अभियांत्रिकी महाविद्यालयाला सदर सेवा पुरविण्याचा प्रदिर्घ अनुभव असलेल्या तसेच उत्कृष्ठ व अखंडीत सेवेची हमी या निकषांची पुर्तता करण्याऱ्या बी.एस.एन.एल, पुणे व टाटा टेली सर्व्हिसेस, महाराष्ट्र लिमिटेड, पुणे या दोन्ही कंपन्यांना निगोसिएशनसाठी बोलावून कमी दर असलेल्या कंपनीची इंटरनेट सेवा एक वर्षासाठी घेण्याची सभेने सर्वानुमते मंजुरी दिली.

विषय क्र. १२ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सोलर सिस्टिमसाठी मिळालेल्या अनुदानासंदर्भातील कार्यवाहीची माहिती घेण्याबाबत.

ठराव : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अभियांत्रिकी महाविद्यालयात सोलर सिस्टिम बसविण्यासाठी ५ लाख रुपयांचे अनुदान मंजुरीचे पत्र मिळाले आहे. विद्यापीठाने जाहीर केलेल्या यादीतील पुरवठादारांकडून दर पत्रके बोलावून कमी दर असलेल्या मे. व्हिक्ट्रॉनिक्स कंट्रोल, पुणे यांना खरेदी पत्र देण्यात आले. सभेने सदर प्रक्रियेची माहिती घेवून सोलर सिस्टिम बसविण्यास मान्यता दिली व सदर सिस्टिममध्ये चिनी बनावटीचे वस्तू / उपकरणे वापरु नये असे सुचित केले.

विषय क्र. १३ : अभियांत्रिकी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेणे व मान्यता देणेबाबत.

ठराव : अभियांत्रिकी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती घेण्यात आली.

| अ. क्र. | शैक्षणिक उपक्रम | सा.फु.पुणे विद्यापीठाकडून मिळालेले अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र | रु. १,७२,५७१/– |
| २ | अभ्यासक्रम पुनरावृत्ती कार्यशाळा – चतुर्थ वर्ष मेकॅनिकल व कॉम्प्युटर विभाग | रु. ४०,०००/– |
| ३ | व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा | रु. १०,०००/– |
| ४ | आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा | रु. २५,०००/– |
| ५ | निर्भयकन्या अभियान | रु. १५,०००/– |
| ६ | रोजगार मेळावा | रु. २५,०००/– |
| ७ | करिअर गाईडन्स | रु. १०,०००/– |
| ८ | स्पेशल गाईडन्स | रु. ९,०००/– |
| ९ | कमवा शिका योजना | रु. ९३,९९८/– |
| | एकूण | रु. ३,२६,५७१/– |

| अ. क्र. | उपक्रम | फायदे |
|---|---|---|
| १ | इनोव्हेशन क्लब | १. विद्यार्थी व शिक्षकांस आय.आय.टी. मुंबई मधून प्रशिक्षित व औद्योगिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या तज्ञांचे मार्गदर्शन<br>२. विद्यार्थ्यास औद्योगिक उपयोगिता असणाऱ्या प्रोजेक्टवर काम करण्याची संधी<br>३. प्राध्यापकांस त्यांच्या संशोधन कार्यात मार्गदर्शन<br>४. विद्यार्थी व शिक्षकांना वेगवेगळया इंडस्ट्रीमध्ये प्रशिक्षणास पाठविणे. |

| | | |
|---|---|---|
| २ | आय.आय.टी. मुंबई रिमोट सेंटर | १. आय.आय.टी मधील जागतिक दर्जाच्या प्राध्यापकांच्या व्याख्यान व कार्यशाळेमध्ये ऑनलाईन पध्दतीने सहभागी होण्याची महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांना सुविधा उपलब्ध होईल.<br>२. विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी सदर रिमोट सेंटर मध्ये नोंदणी करुन ऑनलाईन कोर्सेस करु शकणार. |
| ३ | कांगो एज्युकेशनल सर्व्हिस, मुंबई यांचे मार्फत गेट परीक्षेसाठी मार्गदर्शन वर्ग व सराव परीक्षा केंद्र | चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी GATE परीक्षेच्या तयारीसाठी तज्ञांची ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानांचे आयोजन, मार्गदर्शन व सराव परीक्षा घेण्यात येतील. यामुळे उच्चशिक्षण व नोकरीमध्ये प्राधान्य मिळेल. |
| ४ | केंद्र शासनाच्या सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी पार्क यांचेमार्फत उद्योजकता विकास कार्यशाळा | विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक होण्यासाठी लागणारे गुण वृद्धींगत करणे व उद्योजक होण्यासाठी मार्गदर्शन करणे. |

वरील उपक्रमांची सभेने माहिती घेतली तसेच भारत सरकारच्या विविध खात्यातर्फे मिळणाऱ्या अनुदानासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यास सुचित केले.

**विषय क्र. १४** : शैक्षणिक वर्ष २०१७–१८मध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त व प्रलंबित फी बाबत तसेच महाराष्ट्र शासनाकडून येणाऱ्या प्राप्त व प्रलंबित शिष्यवृत्तीच्या रक्कमेची माहिती घेणेबाबत.

**ठराव** :

१. शैक्षणिक वर्ष २०१७–१८मध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त व प्रलंबित फी बाबत तसेच महाराष्ट्र शासनाकडून येणाऱ्या प्राप्त व प्रलंबित शिष्यवृत्तीच्या एकूण रक्कमेची माहिती घेण्यात आली.

२. महाराष्ट्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने मिळण्यसाठी अध्यक्ष मा. अजितदादा पवार यांनी

शासनाकडे पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले व सदर बाबतीत स्वतः शासन स्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

३. शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून महाराष्ट्र शासन शिष्यवृत्तीची रक्कत महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा न करता विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याने टयुशन फी वसुल करण्याकरिता कठोर निर्णय घेण्यात यावे व तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रलंबित फी बाबत मेसेजव्दारे वेळोवेळी कळविण्यात यावे अशी शिफारस असे सभेने सुचित केले.

**विषय क्र. १५** : ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांनी पी.एम.के.व्ही.वाय अंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाला दिलेल्या कोर्सेसची माहिती घेणेबाबत.

**ठराव** : ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांनी पी.एम.के.व्ही.वाय योजने अंतर्गत खालील अभ्यासक्रम अभियांत्रिकी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून सुरु करण्याची परवानगी दिली.

| अ क्र. | विभाग | कोर्स नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | सिव्हिल इंजिनीअरिंग | अस्टिटंट सव्हेअर | २४ |
| २ | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | ज्यनिअर सॉफ्टवेअर डेव्हलपर्स | २४ |
| ३ | ई ॲन्ड टी सी | डीटीएच सेट टॉप बॉक्स इंस्टॉलेशन ॲन्ड सर्व्हिस टेक्नीसीअन | २४ |
| ४ | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | लेथ ऑपरेटर | २४ |
| ५ | इंफॉरमेशन टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग | डोमेस्टिक डेटा इन्ट्री ऑपरेटर | २४ |

ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांनी पी.एम.के.व्ही.वाय योजने अंतर्गत वरील अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून अभियांत्रिकी महाविद्यालयात सूरु करण्यासाठी सभेने सर्वानुमते मान्यता दिली.

**विषय क्र. १६** : अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०१७–१८ च्या प्रथम सत्राच्या निकालाची माहिती घेण्याबाबत.

**ठराव** : शैक्षणिक वर्ष २०१७–१८ च्या प्रथम सत्राचा विभागवार निकालाची माहिती घेण्यात आली.

## मेकॅनिकल इंजिनीअरिंग

| द्वितीय वर्ष मेकॅनिकल | प्राध्यापकाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रा. आदित्य वानखेडे | MP-1 | ४३.९० |
| २ | प्रा. विकासकुमार म्हेत्रै | ATD | ४३.९० |
| ३ | प्रा. राकेश पाटील | MS | ५८.५४ |
| ४ | प्रा. संकेत हिंगणकर | SOM | २४.३९ |
| ५ | प्रा. पंकज पाटील | M-3 | ५३.६६ |
| तृतीय वर्ष मेकॅनिकल | | | |
| १ | प्रा. दत्तात्रय कांबळे | DME-1 | ४५.३५ |
| २ | प्रा. गणेश कोंढाळकर | HT | ६९.७७ |
| ३ | प्रा. चेतन कोळंबे | TOM | ३८.३७ |
| ४ | प्रा. महेश कुंभारे | TM | २६.२४ |
| ५ | प्रा. संदिप राऊत | MQC | ८३.७२ |
| चतुर्थ वर्ष मेकॅनिकल | | | |
| १ | प्रा. चंद्रदिप नगराळे | RAC | ८४.६२ |
| २ | प्रा. निलेश जाधव | CCA | ९४.७४ |
| ३ | प्रा. काशीनाथ मुंडे | DOM | ७६.३२ |
| ४ | प्रा. संकेत हिंगणकर | EAM | १०० |
| ५ | प्रा. संदिप राऊत | AMP | ९६.८८ |
| ६ | प्रा. आदित्य वानखेडे | OR | १०० |

## कॉम्पुटर इंजिनीअरिंग

| द्वितीय वर्ष कॉम्पुटर | प्राध्यापकाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रा. तेजश्री गायकवाड | DM | ७२.७२ |
| २ | प्रा. प्रणाली महाडीक | DELD | ७९.५४ |
| ३ | प्रा. स्नेहा जगताप / प्रा. साधना केकण | DSA | ७५ |
| ४ | प्रा. अमित कदम | COA | ७५ |
| ५ | प्रा. विजेंद्र गायकवाड | OMP | ८८.६३ |
| तृतीय वर्ष कॉम्पुटर | | | |
| १ | प्रा. अनिल लोहार | TOC | ८० |
| २ | प्रा. जितेंद्र मुसळे | DMS | ८० |
| ३ | प्रा. प्रणाली महाडीक | SEPM | ९१.६७ |
| ४ | प्रा. विजेंद्र गायकवाड | ISEE | ८० |
| ५ | प्रा. रमा गायकवाड | CN | ७१.६७ |
| चतुर्थ वर्ष कॉम्पुटर | | | |
| १ | प्रा. अमित कदम | DAA | ९८ |
| २ | प्रा. साधना केकण | PMCD | ९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | प्रा. मनोज मुळीक | SSDA | ९८ |
| ४ | प्रा. तेजश्री गायकवाड | DMTA | १०० |
| ५ | प्रा. अनिल लोहार | PC | ९२.१६ |

आय.टी इंजिनीअरिंग

| द्वितीय वर्ष आय. टी | प्राध्यापकाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रा. धनश्री जोशी | FDS | ८१ |
| २ | प्रा. रमेश लव्हे | DELD | ७४ |
| ३ | प्रा. देविका रणखांबे | DS | ७२ |
| ४ | प्रा. आर.बी.दिवटे | COA | ७० |
| ५ | प्रा. कमलेश जेठा | PSOP | ७० |
| तृतीय वर्ष आय.टी | | | |
| १ | प्रा. एस.आर.कोकणे | TOC | २९.१६ |
| २ | प्रा. आर.ए.निकम | DMS | ५० |
| ३ | प्रा. कमलेश जेठा | SEPM | ७८.२६ |
| ४ | प्रा. करीश्मा बडगुजर | OS | ६०.८६ |
| ५ | प्रा. दिपा माने | HCI | ७३.९१ |
| चतुर्थ वर्ष आय.टी | | | |
| १ | प्रा. रमेश लव्हे | ICS | ६६.६७ |
| २ | प्रा. एस.आर.कोकणे | SMD | ८३.३३ |
| ३ | प्रा. आर.बी.दिवटे | ML | ९०.९१ |
| ४ | प्रा. करीश्मा बडगुजर | E-1 | १०० |
| ५ | प्रा. दिपा माने | E-2 | ८३.३३ |

सिव्हिल इंजिनीअरिंग

| व्दितीय वर्ष सिव्हिल | प्राध्यापकाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रा. योगेश देशमुख | BTM | ८६.४९ |
| २ | प्रा. ए. वाय. पाटील | SOM | ५९.४६ |
| ३ | प्रा. सचिन यादव | GTE | २२.८६ |
| ४ | प्रा. एस. आर. नाईकवाडी | SUR | ६७.५७ |
| ५ | प्रा. पी. एस. पाटील | M-3 | ३५.१४ |
| तृतीय वर्ष सिव्हिल | | | |
| १ | प्रा. पी. डी. निंबाळकर | HWR | ७७.०५ |
| २ | प्रा. एस. बी. शिंदे | IECT | ९५.१६ |
| ३ | प्रा. ए. एम. अडमुटे | SD-1 | ६६.१३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | प्रा. सचिन यादव | SA - 2 | ६६.१३ |
| ५ | प्रा. कुणाल ठाणेकर | FM | ६२.९० |
| चतुर्थ वर्ष सिव्हिल | | | |
| १ | प्रा. एस.एम. गावंडे | EE - 2 | ८०.७० |
| २ | प्रा. के. वि. म्हैत्रे | TRE | ९६.४९ |
| ३ | प्रा. एस. बी. शिंदे | SD - 3 | ८४.२१ |
| ४ | प्रा. ए. वाय. पाटील | ACT | ९४.७४ |
| ५ | प्रा. ए. एम. अडमुटे | Earthquake Engg | ९४.७४ |

ई अॅन्ड टीसी इंजिनीअरिंग

| व्दितीय वर्ष ई अॅन्ड टीसी | प्राध्यापकाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रा. व्हि. व्हि. भिमटे | EDC | २९ |
| २ | प्रा. व्हि. आर. घिये | SS | ० |
| ३ | प्रा. एम. एन. काकडे | ECM | ५७ |
| ४ | प्रा. एस. एम. वीर | DE | ८४ |
| ५ | प्रा. डी. पी. जोशी | DSA | ८५ |
| तृतीय वर्ष ई अॅन्ड टी सी | | | |
| १ | प्रा. व्हि. व्हि. भिमटे | DC | ७६.९२ |
| २ | प्रा. एस. एस. जगताप | DSP | ४४ |
| ३ | प्रा. एम. एन. काकडे | EMG | १३.४ |
| ४ | प्रा. व्हि. आर. घिये | MC | ३५ |
| ५ | प्रा. एस. एस. जगताप | MECH | ८१.४८ |
| चतुर्थ वर्ष ई अॅन्ड टी सी | | | |
| १. | प्रा. एस. एस. साळवेकर | VLSI | ५५ |
| २ | प्रा. एस. एम. वीर | CN | ४३ |
| ३ | प्रा. एस. एस. हजारे | MWE | ७६ |
| ४ | प्रा. एम. एन. काकडे | DIP | ९० |
| ५ | प्रा. एस. एस. हजारे | EDP | ९० |

प्रथम वर्ष इंजिनीअरिंग

| तुकडी ए | प्राध्यापकाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रा. कुणाल ठाणेकर | BCEE | ८५ |
| २ | प्रा. रेश्मी केणवत | M - I | २९.२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | प्रा. प्रियंका गायकवाड | FPL | ५२ |
| ४ | प्रा. प्राजक्ता कचरे | EG | ९०.२४ |
| ५ | प्रा. बालाजी सेलुकर | Chemistry | ३१ |
| ६ | प्रा. मेघना कानुंजे | BEE | ११.०४ |
| तुकडी बी | | | |
| १ | प्रा. राहूल शर्मा | M - 1 | ३०.२३ |
| २ | प्रा. गायत्री कांबळे | Chemistry | २३ |
| ३ | प्रा. प्रियंका गायकवाड | FPL | ५६.८१ |
| ४ | प्रा. मेघना कानुंजे | BEE | २६ |
| ५ | प्रा. सोमय्या नाईकवाडी | BCEE | ७४.४१ |
| ६ | प्रा. विशाल मोमले | EG - 1 | ८८.३७ |
| तुकडी सी | | | |
| १ | प्रा. क्रांतीकुमार म्हेत्रे | BCEE | ७१ |
| २ | प्रा. राहूल शर्मा | M - 1 | २४ |
| ३ | प्रा. स्नेहा साळवेकर | BXE | २१ |
| ४ | प्रा. प्राजक्ता कचरे | EG - 1 | ७४ |
| ५ | प्रा. मोनिका जगताप | PHY | २१ |
| ६ | प्रा. देविका रणखांबे | FPL | ४४.१७ |

वरील प्रमाणे विद्यार्थ्यांच्या निकालासंदर्भात सभेने माहिती घेतली व कमी निकाल लागलेल्या प्राध्यापकांवरील कार्यवाहीची माहिती सभेने घेतली. निकाल वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावे तसेच प्रत्येक सत्रात प्राध्यापकांकडून परफॉरमन्स अॅपरेझल फॉर्म भरुन घ्यावे व त्याचे स्वरुप मा.श्री.पासलकर यांनी द्यावे असे सुचित करण्यात आले.

**विषय क्र. १७** : अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये बोर्ड रूम, स्मार्ट क्लासरुम (आय.आय.टी, मुंबई यांचे रिमोट सेंटर करिता), ४ सेमिनार हॉल व ऑफिसमध्ये महत्वाचे दस्तऐवज ठेवण्याकरिता फर्निचर / कपाटे घेणेबाबत.

**ठराव** : अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये बोर्ड रूम, स्मार्ट क्लासरुम (आय.आय.टी, मुंबई यांचे रिमोट सेंटर करिता), ४ सेमिनार हॉल व ऑफिसमध्ये महत्वाचे दस्तऐवज ठेवण्याकरिता फर्निचर / कपाटे घेण्या संदर्भात माहिती घेण्यात आली.

| अ. क्र | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च रु. लाखामध्ये |
|---|---|---|
| १ | बोर्ड रूम :– प्रोजेक्टर, टेबल–खुर्च्या<br>सेमिनार हॉल :– प्लॅस्टिक खुर्च्या,<br>ऑफिस खुर्च्या, साऊंड सिस्टिम | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| २ | कार्यालयामधील दस्तावेज ठेवण्यासाठी सुरक्षा प्रणालीयुक्त कपाटे | ३.५० |
| ३ | स्मार्ट क्लासरुम (IIT Remote Centre करिता ) | ५.०० |
| ४ | २०११ साली घेतलेले एकूण ५० कॉम्प्युटर बदलून अद्यावत प्रणालीचे कॉम्प्युटर घेणे. | १७.५० |
| ५ | प्रयोगशाळेतील उपकरणे :— <br>➢ सिव्हिल इंजिनीअरिंग.:— <br>- अॅटोमिक स्पेक्ट्रॉ फोटोमीटर (ii) एस सी चेंबर सहित <br>- हाय व्हॉल्युम एअर सॅम्पलर | २३.५० |
| ६ | ➢ मेकॅनिकल इंजिनीअरिंग :— <br>- बॉयलर <br>- लेंथ मशिन्स (१० नग ) | १८.०० |
| ७ | ➢ इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. | ०५.०० |
| | एकूण | ९२.५० |

वरील कामांसाठी येणाऱ्या खर्चाच्या पुर्ततेसाठी मा. नवनाथ पासलकर यांनी मा. अध्यक्षांस मोठया व्यावसायिक कंपन्याच्या सी.एस.आर फंड मधून करुन देण्यासंदर्भात विनंती केली.

**विषय क्र. १८** : अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नॅक प्रस्तावाची माहिती घेण्याबाबत.

**ठराव** : अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नॅक करिता सादर केलेल्या प्रस्तावाची माहिती घेतली व त्यास मान्यता दिली.

**विषय क्र. १९** : अस्थायी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना टेक्नीकल ब्रेक देण्याबाबत व कर्मचाऱ्यांच्या नविन नियुक्तीबाबत.

**ठराव** : अस्थायी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या टेक्नीकल ब्रेकबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी तथापी अॅडजन्ट फॅकल्टी बाबत मा. श्री. पासलकर यांच्या सल्यानुसार व मार्गदर्शनानुसार निर्णय घ्यावा तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या शिपाईमध्येच महाविद्यालयाचे

कामकाज भागवावे असे सांगण्यात आले. अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या कार्यालय अधिक्षक / रजिस्ट्रार व वेगवेगळया विभागात प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून भरणे संदर्भात सर्वानुमते मान्यता दिली.

**विषय क्र. २०** : अभियांत्रिकी महाविद्यालयामधील इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी विभागातील प्रा. देविका रणखांबे यांसकडून वारंवार घडलेल्या घटनांची माहिती देणेबाबत.

**ठराव** : प्रा. देविका रणखांबे यांच्या बाबत वकीलाच्या सल्यानुसार त्यांचे मागील
१. तीन वर्षाचे गोपनीय अहवाल.
२. संस्थेकडून नोटीस देणे.
३. संस्थास्तरावर चौकशी कमिटी नेमणे.
४. अहवाल सादर करुन अंतिम निर्णय घ्यावे असे सुचित केले.

सभेचे अध्यक्ष मा. श्री. अजितदादा पवार यांनी महाविद्यालयाशी निगडीत असणाऱ्या तांत्रिकबाबतीत मा. श्री. नवनाथ पासलकर यांच्याशी चर्चा करुन मार्गदर्शन घ्यावे त्यास महाविद्यालय विकास समिती चर्चा करुन अंतिम निर्णय घेईल असे सांगितले.

महाविद्यालयीन विकास समिती सभा मा.श्री.अजितदादा पवार, उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विषयांवर सविस्तर चर्चा व मार्गदर्शन करुन खेळेमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

डॉ. सुनिल ठाकरे
प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती

मा. श्री. अजितदादा अनंतराव पवार
सभेचे अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती

आपल्या मार्गदर्शनाकरिता सविनय सादर.

मा.सौ. प्रमिला भागवतराव गायकवाड
सरचिटणीस
अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद,
पर्वती, पुणे.०९

*********

AKHIL BHARATIYA MARATHA SHIKSHAN PARISHAD'S
ANANTRAO PAWAR COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
Sr. No. 103, Parvati, Pune - 411 009.
Tel.: 020-24218901/8959 Tele Fax : 020-24213929
Web.: http://www.abmspcoerpune.org Email : abmspcoe@yahoo.com

Approved by AICTE & Govt. of Maharashtra, Affiliated to Savitribai Phule Pune University
NAAC ACCREDITED, DTE CODE :- EN 6794, AISHE CODE :- C-41484
Savitribai Phule Pune University Identification No. PU/PN/Engg. / 441/2012

# Internal Quality Assurance Cell (IQAC)

## Minutes of IQAC Meeting No. 1 (2018-19) 21 August 2018

